# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- ५५/२०२३** **दिनांक :- १५/०२/२०२३**

## वसई परिसरात मुदत बाहय वास्तव्य करणा-या ०२ नायजेरियन नागरिकांस काळया यादीत टाकून हददपार करण्यात विशेष शाखेस यश.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात परकीय नागरिक त्यांची व्हिसा मुदत संपून देखील वास्तव्यास असल्याने त्यांना Deport करण्याबाबत वरिष्ठ पोलीस अधिका-यांकडून सूचना देण्यात आल्या होत्या. त्याअनुषंगाने मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातर्गत मुदत बाहय वास्तव्य करणा-या परकीय नागरीकांना Deport करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली.

परकीय नागरिक नामे १. Mr. Jude Chikwado Izima, Nigerian व २. Mr. Christopher Jim Chukwuma, Nigerian हे अनुक्रमे दिनांक २९/०२/२०१४ व दिनांक १७/०३/२००९ रोजीपासुन तुळींज पोलीस ठाणेचे हददीत बिजनेस व्हिसावर मुदतबाहय वास्तव्य करीत असल्याचे आढळून आल्याने All India Wireless msg/LOC Check करुन इतर जिल्हयांतुन त्यांचेविरुध्द काहीही आक्षेपार्ह नोंदी आहेत का याबाबत खातरजमा करुन काहीही आक्षेपार्ह नोंदी मिळून न आल्याने त्यांना अनुक्रमे दिनांक ३१/०१/२०२३ व दिनांक ११/०२/२०२३ रोजी ०२.४० वा. छत्रपती शिवाजी महाराज आंतराष्ट्रीय विमानतळ येथे नेवुन म.पो.हवा मंजुशा राजन गुप्ता यांनी हददपार केले आहे. नमूद परकीय नागरिक हे भारतात पुन्हा परत येवु नये याकरीता त्यांचे Black Listing प्रकरण The Deputy Director(Immigration) Bureau of Immigration, New Delhi यांना सादर करण्यात आलेले आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) तथा परकिय नागरिक नोंदणी अधिकारी, श्री. विनायक नरळे, सहायक पोलीस आयुक्त (मुख्यालय) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. धादवड, स.पो.नि. सोनलकर, म.पो.हवा. मंजुशा राजन गुप्ता यांनी केलेली आहे.

----oooo----